REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# जात्यांध, धर्मांध वर्गा विरुध्दचा आणि अंधश्रध्देविरुध्दचा संघर्ष

प्रा. डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर, जि- उस्मानाबाद.

## प्रस्तावना:-

- **जात्यांध, धर्मांध वर्गा विरुध्दचा संघर्ष**

दारिद्र्य आणि उपेक्षेचे चटके सहन केलेल्या अण्णाभाऊंनी वेठबिगारी, पिळवणूक, बाट-विटाळ, अस्पृश्यता, जातीचे विषारी बाण, दलित, शोषित, पिडीत याचं नाकारलेले जगणं, गाव-शिवेच्या बाहेर हाकलून दिलेल्यांचं लाजिरवाणं जगणं अनुभवल आणि त्यातून त्यांनी वेगळाच वसा घेतला. तो म्हणजे मानव मुक्ती लढ्याचा. साहित्य हे परिवर्तनाच्या चळवळीची बीज जनमाणसात प्रभावीपणे रुजविण्याचे प्रभावी शस्त्र आहे हे अण्णाभाऊ साठेंना माहित होत आणि या जाणीवेतून लिहित असल्यामुळे आणि केवळ लिहून मोकळे व्हायचे नाही तर त्याच्या संदेशाचे परिणामकारक सादरीकरण आपल्या कलेच्या माध्यमातून करायचे या भावनेने अण्णाभाऊ साठेंनी निर्माण केलेले साहित्य हे बंद खोलीत बसून कल्पनेचे इमले बांधणारे, करमणूक करणारे किंवा कल्पना विश्वात रमणारे न व्हते तर उपेक्षितांना न्याय देणारे आणि समाज कंटकांना नागवनारे ते दुधारी शस्त्र होते असे म्हटलयास वावगे ठरणार नाही.

## १ जातीअंताविरुध्द लढा देणाऱ्या इतर नेतृत्वांशी साम्य :-

प्रस्थापित हिंदु धर्म संस्कृतीने शुद्रातीशुद्र आणि स्त्रियांना वेदाधिकारच नव्हे, तर सन्मानाने जगण्याचे सगळेच अधिकार नाकारुन त्यांना पशुतुल्य जीवन जगण्यास भाग पाडले. म्हणून या पशुतुल्य जीवनमानातून त्यांचा उध्दार करण्यासाठी आणि त्यांना माणूस म्हणून इतर माणसांप्रमाणे जगण्याचा अधिकार देण्यासाठी महात्मा फुले, स्त्री शुद्र, कष्टकरी, सामाजिके परंपरांनी ग्रासलेले लोक यांना आवश्यक असणाऱ्या न्यायाची बाजू मांडणारे, नायक आणि नायिका साहित्यातून उभे करुन सामाजिक परिवर्तनासाठी, सामाजिक प्रबोधनाची चळवळ समर्थपणे पेलणारे अण्णाभाऊ साठे हे पहिलेच साहित्यीक आहेत. राजर्षी शाहु महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचा समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्ववादी विचारांची धुरा आणि ध्वजा आपल्या खांद्यावर घेऊन परिवर्तनाच्या चळवळीचा मार्गक्रम करणारे अण्णाभाऊ साठे हे मानबिंदु आहेत.[१] अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कलेंच्या माध्यमातून या विचारवंतांचे विचार, संदेश समाजमनामध्ये रुजविण्याचे काम केले, परंतू तरीही या कार्याची दखल कोणीच न घेता त्यांना उपेक्षित ठेवणे ही खेदाची बाब आहे.

## २. जातीअंता संदर्भात अण्णाभाऊंचा कम्युनिझम :-

"कम्युनिस्ट विचारप्रणालीप्रमाणेच 'धर्म' ही सर्वसामान्य लोकांसाठी अफूची गोळी आहे आणि मानवजातीच्या प्रगतीमध्ये जाती, धर्म हे घातक अडथळे आहेत असा अण्णाभाऊंचाही विश्वास होता.[२] असे डॉ.बजरंग कोरडे म्हणतात यावरुन असे दिसून येते की, बहुतेक कम्युनिस्ट विचारवंतांपैकी अण्णाभाऊ साठे हे ही असे एक होते, ज्यांनी जात, धर्म या भारतीय समाजातील वास्तवांकडे व त्यावर आधारित सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व तत्सम व्यवहारांकडे डोळे झाक केलेली नव्हती म्हणजेच अण्णाभाऊंनी उघड्या डोळ्यांनी कम्युनिझमचा स्वीकार केलेला होता.

भारतीय समाजव्यवस्थेचे जे स्तर कम्युनिझमला दिसले नव्हते ते अण्णाभाऊंनी अनुभवलेले होते. म्हणून अण्णाभाऊंना याची जाणीव होती की, भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करता, इथे वर्गाबरोबरच जात व धर्म या वास्तवांचा विचार करावाच लागेल, तरच खऱ्या अर्थाने भारतात कम्युनिझम रुजेल.[३] नेमकें हे गुढ भारतीय कम्युनिस्टांच्या लक्षात न आल्याने कम्युनिझम भारतातमध्ये अपेक्षेप्रमाणे यशस्वी होऊ शकला नाही. यावरुन अण्णाभाऊ साठेंची दूरदृष्टी आणि स्वतंत्र्य वैचारिक बैठक लक्षात येते.

अण्णाभाऊ साठेंनी भारतातील जातीय वर्गिय विषमतेवर आणि त्यामुळे सर्वसामान्य माणसांवर होणारा अन्याय, अत्याचार, पिळवणूक इत्यादींवर आपल्या साहित्यातून जमेल तेंव्हा हल्ला चढवला व अन्यायकारी अशी जातीय व वर्गिय व्यवस्था संपुष्टात येऊन इथे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांचे राज्य स्थापन झाले पाहिजे, असा विचार आपल्या साहित्यकृतीमधून मांडलेला आहे.

**३ जाती अंत आणि अस्पृश्योध्दाराच्या चळवळीचे जनक म.फुले यांच्या बद्दल अण्णाभाऊंचे मत :-**

अण्णाभाऊ साठे यांच्या पोवाड्यामध्ये अण्णाभाऊंनी म.फुले यांना वंदन केलेले आहे. अण्णाभाऊ साठेंच्या "महाराष्ट्राची परंपरा" या त्यांच्या पोवाड्यातील चौथ्या चौकात म.फुलेंचा उल्लेख करुन अण्णाभाऊ लिहितात,

"महात्मा फुले लाभले महाराष्ट्राला |
अन्याय निवारुनी न्याय द्यावा दलिताला ||"

यावरुन असे दिसून येते की अण्णाभाऊंनी म.फुलेंचा अभ्यास करुन, त्यांच्या विचारांच्या प्रभावाने आपली जाती संदर्भातील भावना अधिक तीव्र केली म.फूलेंच्या वैज्ञानिक दृष्टिला आपल्या आचरणात उतरविले थोडक्यात, अण्णाभाऊंची जाती अंताच्या लढ्याची भावना आणि वैचारिक बैठक यातून स्पष्ट होते.

**४ आवडी :-**

'आवडी' ही अण्णाभाऊंची गाजलेली कथा असून, ती उच्च जातीतील आवडी चौगुले व ऐकाळी मागास, दलित, हलक्या समजल्या जाणाऱ्या जातीतील धनाजी रामोशी यांच्या प्रेमाची आणि आंतरजातीय विवाहाची ही कथा आहे.

आवडीचा उल्लेख प्रस्तुत संशोधन अध्ययनाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये प्रेमासाठी जातीची बंधने नाकारणाऱ्या स्त्रिच्या रुपाने आलेलाच आहे, एकंदरीत आपल्याला घरच्यांनी करुन दिलेला नवरा उत्तम पाटील हा फिट्स येण्याचा आजार असल्याचे लक्षात येताच, उच्चवर्णीयातील हे सर्व निमुटपणे सहन करण्याच्या रिवाजाला छेद देऊन ती बंड करते आणि हलकया जातीतील धनाजी सोबत निघून जाते. याच्या संतापातून आपल्या घराण्याला कलंक लावला या भावनेतून सुडाने पेटून उठलेला आवडीचा भाऊ नागू ती नातेवाईकांना भेटायला आल्यानंतर तिचा खुन करतो. तेंव्हा आपल्या पत्नीच्या खुनाचा बदला घेण्याचे धनाजी ठरवतो आणि नागूचा खुन करतो.[४] ही समस्या आजही समाजामध्ये दिसून येते याला आज ऑनर कीलींग असे संबोधण्यात येते.

या देशातील जातीअंत करावयाचा असेल तर, आंतरजातीय विवाह होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. हा संदेश जनमानसांमध्ये पोहोचविण्यासाठी अण्णाभाऊ साठेंनी ही कलाकृती साकारुन, ती वाचकांसमोर मांडलेली आहे. डॉ.मनोहर रोकडे म्हणतात की, "या कादंबरीतून जातीभेदाच्या भिंती नष्ट करण्याची अण्णाभाऊंची विचारसरणी स्पष्ट होते. या कादंबरीवर 'टिळा लावते मी रक्ताचा' हा चित्रपट १९६१ मध्ये प्रदर्शित झालेला आहे, म्हणजेच अण्णाभाऊ साठे यांना जातीच्या भिंती नष्ट करावयाच्या होत्या आणि त्याविरोधात त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिलेला आहे.

**५ वळण :-**

अण्णाभाऊ साठेंची 'वळण' ही कथा दलित जीवनावर आधारित सत्यकथा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना मेलेल्या ढोरांचे मांस खाणे यांसारखा घाणेरड्या सवय सोडून देण्याचे आवाहन केले होते पण या सवयींचे वळण खोलवर रुजले असल्यामुळे ते सोडणे बऱ्याच दलितांना अवघड वाटत होते.[५] याचे चित्रण या कथेत आहे. अण्णाभाऊ साठे वळण ह्या कथेच्या माध्यमातून, ज्या कृतीमुळे आपला सामाजिक तिरस्कार केला जातो, ती कृती करण्यापासून दलितांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करत असतांना दिसून येतात. जातीअंताची लढाई लढताना, आपला सामाजिक स्तर सुधारण्यासाठी अण्णाभाऊ संदेश देतात. 'वळण' ही दलितांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेली कृती आहे असे पहावयास मिळते.

**६ सापळा :-**

'सापळा' ही कथा मात्र अण्णाभाऊंच्या विचारांचे दर्शन घडवणारी कथा असून, या कथेमध्ये वास्तव व कल्पित यांचे मिश्रण आहे. त्याविषयी नानासाहेब कहाळे म्हणतात की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांमध्ये अस्मिता जागृती निर्माण केली त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील दलितेतरांमध्ये वर्णाभिमानामुळे संताप उसळला, तयांनी अस्पृश्यांना सापडळयात पकडण्याचा प्रयत्न केला पण अखेर अस्पृश्यांनी उच्च वर्णियांवर मात केली."[६] असे या कथेचे कथानक आहे. या कथेमध्ये असे दिसून येते की, जाती व्यवहारांची अण्णाभाऊ साठेंनी चांगलीच चिरफाड करुन, अस्पृश्यांनी नवीन जीवनमूल्ये धारण केल्याची वास्तवता दर्शविलेली आहे. दलितांनी आर्थिक सत्ता हस्तगत केल्याशिवाय, त्यांना मानवी जीवन प्राप्तच होऊ शकत नाही. हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला महान संदेश अण्णाभाऊ साठेंनी 'सापळा' या कथेतुन साकार करुन जनमाणसामध्ये रुजविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची क्रांती त्यांचे विचार जनमानसामध्ये तळागळामध्ये पोहोचविण्याचे काम अण्णाभाऊ साठेंनी केलेले आहे. दलितांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली अस्मिता जागी करण्याचे आणि तिची जाणीव करुन देण्याचे, कार्य अण्णाभाऊ साठेंनी केलेले आहे. यासाठी अण्णाभाऊ साठे उच्चवर्णीय वर्गाशी संघर्ष करताना दिसून येतात, यावरुन अण्णाभाऊ साठेंनी केवळ मार्क्सवादानुसार कामगारांसाठीच काम केलेले नाही तर जाती अंताची लढाई लढण्यासाठी रणशिंग फुंकून, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतही आपले योगदान दिलेले आहे असे स्पष्ट होते.

### ७ बारबाद्या कंजारी :-

अण्णाभाऊ साठेंची ही गाजलेली कथा जातीमध्ये सामाजिक व्यवस्थेचे स्वरुप आणि जातींच्या लोकांकडून होणाऱ्या अन्यायाचे चित्रण दाखवणारी कथा आहे. या कथेत मुंबईच्या झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या भटक्या, अशिक्षित व गरीब अशा कंजारी समाजातील बारबाद्या नावाच्या व्यक्तीचे चित्रण आले आहे. कंजारी समाजाची अवस्था दयनीय आहे आणि या समाजात आज ही अमानुष प्रथा प्रचलित आहेत याचे चित्रण या कथेत आलेले आहे.

प्रचलित प्रथेप्रमाणे बारबाद्या आपली मुलगी मिल्ली हिला दोनशे रुपयाला डल्लाराम याला विकतो तिचे लग्न डल्लारामचा मुलगा सदु याच्याशी होणार असते, कंजारी रुढी प्रमाणे एखाद्या स्त्रिला पतिनिधना नंतरही आमरण आपल्या सासरीच रहावे लागते पण आपल्या पतीच्या मृत्युनंतर मिल्ली हा नियम मोडते आणि समोरच्याच झोपडीत राहणाऱ्या हैदऱ्यासोबत पळून जाते. हा विषय जातपंचायतीमध्ये गेल्यानंतर जात पंचायत डल्लारामची बाजू घेते आणि बारबाद्याला वाळीत टाकते पण बारबाद्या या गोष्टीला काहीच किंमत देत नाही. अन्याय परंपरा विरुध्द बंडखोरी करणारा या दृष्टीने अण्णाभाऊ साठेंनी बारबाद्या कंजारी याचे चित्रण रेखाटले आहे.[७] खाप पंचायत नावाने ओळखली जाणारी जात पंचायत तिच्या जुलमी न्यायाचे चित्रण अण्णाभाऊ साठेंनी यामध्ये केले असून, या जात पंचायतीच्या विरोधामध्ये विद्रोह करुन पंचायतीच्या निर्णयांना नामशेष करण्याचा संदेश दिलेला आहे.

नानासाहेब कठाळे म्हणतता की, "बारबाद्या कंजारीच्या कथेत अण्णाभाऊंनी आपल्या वैचारिक आणि अनुभूतीच्या मेधानी सामर्थ्यान दारिद्र्यातील पारंपारिक जाती रिवाजावर घाणाघाती घाव घातलेला आहे."[८] जाती पंचाच्या विरोधामध्ये जाण्याची हिम्मत कोणीही दाखत नसताना अण्णाभाऊ साठेंनी जनमाणसामध्ये जात पंचायतीच्या जुलमी राजवटीच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी अद्युक्त केलेले आहे. खरे पाहिल्यास परिस्थिती अतिशय गंभीर होती. जाती पंचाच्या निर्णयाविरुध्द वागणं म्हणजे त्याकाळी एक प्रकारे सामाजिक आसुडच ओढुन घेण्यासारखे होते. तरी बारबाद्याने त्याची पर्वा न करता पंचायत निर्णय धुडकावून लावला व त्यातच त्याने स्वतःचा विजय मानला, म्हणजेच या ठिकाणी आपणास असे म्हणता येईल की अण्णाभाऊ साठेंनी या कथेमध्ये जातीचा आणि समाजाचा ठेका घेतलेल्या ठेकेदारांची मक्तेदारी मोंडीत काढण्यासाठी, विद्रोह करायचे शिकवलेले आहे. तसेच मानवी जीवनाला पशुतूल्य बनवणारी पारंपारिक जातीमुल्ये नाकारुन, नवीन समानतावादी मूल्ये धारण करण्यास सांगितले आणि तेही बंड करुन म्हणजेच जातीची मक्तेदारी बाळगणाऱ्या वर्गाच्या विरुध्द अण्णाभाऊ साठेंनी कसा संघर्ष केला व त्या विळख्यातून सुटण्यासाठी कशाप्रकारच्या उपाययोजना सूचविल्या हे दिसून येते.

### ● अंधश्रध्देविरुध्दचा संघर्ष :-

भारतीय समाजामध्ये आस्तिक आणि नास्तिक असे दोन वर्ग पहाण्यास मिळतात. आस्तिक वर्ग हा ईश्वराचे अस्तित्व मानुन, श्रध्दा जोपासणारा असतो, ज्यामधून पुढे चालून अंधश्रध्दा जन्म घेते आई वाईट प्रथा, रुढी, परंपरांचा उदय होतो आणि यामध्ये सामान्य माणूस भरडला जातो. त्याला अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागते, हा अज्ञानी वर्ग म्हणून ओळखला जातो तर दुसरा वर्ग हा सुशिक्षित आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारा वर्ग आहे ज्यांना नास्तिक म्हणून संबोधले जाते, हा वर्ग ईश्वराचे अस्तित्व नाकारतो व नैसर्गिक क्रियांमधील कार्यकारण भाव शोधून घडणाऱ्या घटनांची वैज्ञानिक कारण शोधून जुन्या रुढी परंपरा नाकारतो काही अंशी नास्तिक वर्गाने ईश्वराच्या अस्तित्वास कमी अधिकप्रमाणात मान्यही केले तरी अंधश्रध्देवर मात्र तो प्रचंड प्रहार करतो.[९] अण्णाभाऊ साठे हे निरक्षर जरी असले तरी, त्यांच्या विचारांना वैज्ञानिक दृष्टिकोणाचे अधिष्ठाने लाभलेले पहावयास मिळते. अण्णाभाऊ साठेंनी अंधश्रध्देवर, समाजामध्ये पोसल्या जाणाऱ्या कुप्रथा, वाईट रुढी परंपरांवर प्रचंड प्रहार करुन विज्ञानवादाचा पुरस्कार केलेला आहे.

'मरीआईचा गाडा', 'तीन भाकरी', 'बोलकं मुडकं', 'भुतांचा वाडा', 'सुड' आणि 'चालतं मढं' या कथांवरुन असे दिसून येते की अण्णाभाऊ साठे हे वैज्ञानिक दृष्टी असलेले लेखक होते.[१०] या लेखकाने अंधश्रध्देविरुध्द आवाज उठवून समाजामध्ये नव्या विचारांची पेरणी केली, अंधश्रध्दा पाळणाऱ्या वर्गाविरुध्द कडवी झुंज देऊन शेवटी विजय प्रस्थापित केलेला आहे आणि त्या अंधश्रध्दाळू लोकांना नवीन मूल्ये बहाल करुन नवीन वैज्ञानिक दृष्टिकोणाला स्वीकार करण्यास प्रवृत्त केलेले आहे.

### १ मरीआईचा गाडा :-

'मरीआईचा गाडा' ही अण्णाभाऊ साठेंची सुप्रसिध्द लोकप्रिय कथा आहे. या कथेतील नाना हे पात्र पाटलाचा मुलगा आणि विज्ञानवादी शास्त्रीय दृष्टीकोनाचा प्रवक्ता आहे. सटवाजी केरु, भाऊ बाबाजी, म्हादबा हे जुन्या अशास्त्रीय आणि अंधश्रध्देवर आधारलेल्या दृष्टीकोनाचे प्रतिनिधित्व करतात. नाना ही व्यक्तिरेखा ब्रिटीशांविरुध्द बंडखोरी करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावर आधरलेली आहे असे म्हटले जाते क्रांतिसिंह नाना पाटील हे महाराष्ट्रातील प्रसिध्द कम्युनिस्ट नेते होते.

मरीआई नावाची देवी कॉलरा वगैरे रोगाच्या साथी सुरु करते आणि तिला शांत करण्यासाठी तिची पुजा करुन तिचा गाडा शेजारच्या गावाच्या हद्दीत सोडल्यास त्या साथीचे रोग आपल्या गावातून शेजारच्या गावात जातात अशी एक अंधश्रध्दा महाराष्ट्रात प्रचलित होती. मरीआईच्या संबंधी लोकांचे मुद्दे खोडून काढण्यासाठी आणि अंधश्रेध्देतून काढल्या गेलेल्या मरीआईच्या गाड्याला रोखून वैद्यकीय उपचाराचा अवलंब करुन गावात स्वच्छता करुन, आरोग्य पुर्ववत करण्याकरीता नानाला प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते. अंधश्रध्देतील मुद्दे कसे निरर्थक आहेत, हे लोकांना पटवून देण्यात नाना यशस्वी होतात आणि मरीआईचा गाडा कोणत्या गावाच्या हद्दीत न सोडता त्यास

मंदिरात परत ठेवले जाते आणि वैद्यकीय उपचारांचा अवलंब केला जातो. अशाप्रकारे जीवनाबद्दलचा प्रामाणिक वैज्ञानिक आणि नवा दृष्टीकोन जुन्या, अशास्त्रीय व अंधश्रध्देवर आधारित दृष्टीकोनावर विजय मिळवतो हे या कथेत दाखविले आहे.[१२] अण्णाभाऊ साठे यांनी अंधश्रध्दा रोखण्यासाठी आपल्या कौशल्याचा वापर करुन विनोदी आणि चिवट प्रकारे युक्तीवाद केलेला आहे.

भारतीय समाजामध्ये कमालीची अंधश्रध्दा भरलेली आहे हे अण्णाभाऊ साठे ओळखून होते आजही भारतामध्ये अंधश्रध्देने स्तोम माजवलेले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने लक्षणीय प्रगती केल्यानंतर आणि साक्षरता तसेच उच्च शिक्षणाचे प्रमाण एवढे वाढलेले असल्यानंतरही आज अंधश्रध्देला बळी पडून कुप्रथांना खतपाणी मिळते, तर स्वातंत्र्यपुर्व काळात काय परीस्थिती असेल याचे चित्र आपल्या डोळ्यासमोर आणले तर आपण स्तब्ध झाल्याशिवाय राहणार नाही. अशा काळामध्ये अंधश्रध्देच्या विरोधात लढणे ज्या समाजामध्ये देवाच्या नावाने एकही अपशब्द काढला तर प्राण गमावण्याची भिती होती, अशा वेळी आपल्या दुधारी लेखनीने आपल्या कलाकृतीनुसार अंधश्रध्देवर आघात करुन धार्मिक वर्गाच्या विरुध्द संघर्ष केलेला आहे. कर्मकांडास विरोध करुन खुले आव्हान करणे ही अण्णाभाऊ साठे यांच्या वैचारिक परिप्रकल्पतेची आणि आपल्या ज्ञानावर खंबीरपणे ठाम राहिल्याची प्रचिती देते.

### २ भुतांचा वाडा :-

माणसाच्या मनामध्ये अंधश्रध्दा असली की तो कशाप्रकारे घाबरतो याचा प्रत्यय अण्णाभाऊ साठेंनी 'भूताचा वाडा' या कथेमध्ये दिलेला आहे.[१३] पाटलाचा वाडा शापित आहे आपण यावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केल्यास आपल्या परिवाराचीही हीग गत होईल या धास्तीने कोणीही त्या वाड्याकडे फिरकत नाही आणि असे कोणी करु नये म्हणून, अनेक खोटे प्रसंग लोक गावात सांगतात. समाजाने माणूसपण नाकारलेली खालच्या जातीतील काही माणस चोऱ्या करुन जगतात आणि या वाड्याचा आश्रय घेतात प्रचंड ऐश्वर्य असलेल्या या वाड्याचा उपभोगही घेतात कीतीही मोठी चोरी झाली तरी या वाड्याकडे फिरकून पाहण्याच धाडस कोणी करत नाही. उलट वाड्यातील भूताने काय-काय नेलं या घटनांचे प्रसंग चर्चिले जातात, तसेच वाड्यातिल भूतांना शांत करण्यासाठी वाड्याबाहेब खाद्य पदार्थ ठेवले जातात. या प्रकारामुळे ती बहिष्कृत माणसं कशा प्रकारचं जीवन जगतात हे दाखवण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठेंनी केलेला आहे.

### सारांश व निष्कर्ष :-

अण्णाभाऊंचे लेखन व्यक्ती विकासाकडून सामाजिक विकासाकडे जाते. समाजाच्या विकासातच व्यक्तीचा विकास होत असतो असे अण्णाभाऊंनी सांगीतलेले आहे. अण्णाभाऊंनी या ठिकाणच्या भोंगळवादी व चंगळवादी संस्कृतीच्या वर्चस्वावर प्रहारकरून लोकजागृतीकेली. आपल्या लेखनीतून अंधश्रध्देवर हल्ला केला आणि विज्ञान वादावर विश्वास दाखविला. अण्णाभाऊंची विवेकाधिष्ठीत विज्ञानावर श्रध्दा होती. वेडगळ अंधध्देची कल्पना, भूत-पिशाचासरखा भोंगळ भितीवाद, शोषणासाठी निर्माण केली गेलेली देव-देवता, धर्म, रूढी-परंपरा याला त्यांनी विरोध केला. विज्ञान स्विकारल्यानंतर आपोआपच अज्ञानरूपची भूत नष्ट होते. अज्ञान संपल्यानंतर त्याच्या बरोबर अंधश्रध्देचाही शेवट होतो. अंधश्रध्देचा ऱ्हास झाल्यानंतर देव-धर्म परंपरेच्या नावाने चाललेले शोषण थांबते. शोषण थांबल्यानंतर प्रगतीचे व विज्ञान वादाचे मार्ग खुले होतात असे अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहेत.

### संदर्भ सुची:-


१. जाधव संपत, लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे गौरवग्रंथ, पुवोक्त क्र.७ प्र.क्र.५३
२. कठाळे नानासाहेब, पवोक्त क्र. १ प्र.क्र. १
३. डॉ. कोरडे बजरंग, लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे, गौरवग्रंथ पुवोक्त क्र.७ प्र.क्र. ८४
४. तत्रैंव - प्र.क्र. ८५
५. डॉ. रोकडे मनोहर, साहित्यातील तेजस्वी तारा : अण्णाभाऊ साठे, साधना सेवा प्रकाशन, पुणे - २०१५ प्र.क्र. १९
६. तत्रैव -प्र.क्र. ३७
७. कठाळे नानासाहेब, पुवोक्त, प्र.क्र. ८७
८. तत्रैव - प्र.क्र. ४०
९. तत्रैव - प्र.क्र. ८८
१०. पानवटे उपेंद्र, अंधश्रध्दा आणि वास्तव सायली प्रकाशन , मुंबई - २००६ प्र.क्र. ४
११. डॉ. रोकडे मनोहर, पुवोक्त, प्र.क्र. ४४
१२. तत्रैव प्र.क्र. ४५
१३. कांबळे निरज, अण्णाभाऊ साठेंच्या कथा, सागर प्रकाशन, मुंबई - २००२ प्र.क्र. १६